Registered - R.N.I. No.: MAHMAR/2008/26837 • Postal Regd. No.: MCN/110/2015-2017 • Posted at Mumbai Patrika Channel Sorting Office, GPO, Mumbai on 12th & 13th of every month.

डिसेंबर २०१६

खंड ९, अंक १२

किंमत रु. २/-

वाईजइन्व्हेस्ट ॲडव्हायझर्स प्रायव्हेट लिमिटेड यांचे मासिक

वेल्थवाईज™

Wiseinvest®
With YOU, in meeting
FINANCIAL CHALLENGES

आतील बाजूस — पान क्र.

म्युच्युअल फंडांना तुमच्या गुंतवणूक धोरणाचा अविभाज्य हिस्सा बनवा. २

निवडक फंडचा परिणाम ३

वेळ आली आहे, वित्तीय नियोजनाची कास धरण्याची ४

"वाईजइन्व्हेस्ट"

"वेल्थवाईज" हे वाईजइन्व्हेस्ट ॲडव्हायझर्स चे मासिक प्रकाशन आहे. वाईजइन्व्हेस्ट ॲडव्हायझर्स म्युच्युअल फंडस् चा विशेष व्यासंग असलेली उत्तम सल्लागार कंपनी आहे. जरी म्युच्युअल फंडस् हा पैसा गुंतवण्याचा सोपा मार्ग असला तरी व्यावसायिक सल्ला मिळाला तरच तुम्हाला सर्वोत्तम प्राप्ती होईल. आमचे सीईओ श्री. हेमंत रूस्तगी हे सुप्रसिध्द पर्सनल फायनान्स तज्ञ आहेत. त्यांच्याकडे म्युच्युअल फंड उद्योग क्षेत्रातला २५ वर्षांपेक्षा अधिक अनुभव आहे. ते नियमितपणे मुख्य राष्ट्रीय दैनिकांतून आणि व्यापारविषयक मासिकांतून लेख लिहितात त्याचप्रमाणे गुंतवणुकीशी संबंधित दूरदर्शनवरच्या अनेक कार्यक्रमांतून पर्सनल फायनान्स तज्ञ म्हणून उपस्थित असतात. त्या खेरीज, म्युच्युअल फंड उद्योगात अनेक वर्षे व्यतीत केलेल्या व्यावसायिकांचा समावेश आमच्या सल्लागारांच्या फळीत आहे. गेल्या नऊ वर्षांत आमच्या हजारो ग्राहकांना आमच्या उत्तम सल्ल्याचा लाभ झालेला आहे आणि त्यांनी त्यांच्या पोर्टफोलिओचा म्युच्युअल फंडस् हा मुख्य आधार बनवलेला आहे. तुमच्या सध्याच्या तसेच नवीन गुंतवणुकीसाठी तुम्हाला सुध्दा आमच्या तज्ञ मार्गदर्शनाचा लाभ होऊ शकतो. तुम्हाला फक्त आमच्या कोणत्याही शाखेला फोन करणे अथवा information@wiseinvestadvisors.com या संकेतस्थळावर तुमचे तपशील ई–मेल करणे एवढेच करायचे आहे आणि आमचे व्यावसायिक सल्लागार उरलेले सर्व काही करतील.

प्रिय गुंतवणूकदार,

देशात सर्वच बेसावध असताना अचानकपणे घेतलेल्या निश्चलनीकरणाच्या (demonetization) निर्णयाद्वारे, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ८ नोव्हेंबर २०१६ रोजी मध्यरात्रीपासून ५०० आणि १००० च्या नोटा बाद ठरवल्या. या निर्णयामुळे प्रभावीपणे चलनात असलेल्या ८६% नोटा काढून टाकण्यात आल्या आहेत आणि यामुळे तीव्र प्रमाणात रोख रकमेची टंचाई उत्पन्न झाली आहे. नवीन ५०० आणि २००० च्या नोटांनी वापरातून काढण्यात आलेल्या नोटांची जागा घेतलेली आहे.

या नोटबंदीद्वारे अतिरेकी संघटनांकडून वापरण्यात येणाऱ्या नकली नोटांचा प्रवाह आटोक्यात आणण्याचा उद्देश असून सोबतच लाचेची देवाणघेवाण आणि करबुडवेगिरी करण्यासाठी रोखीवर अवलंबून असलेल्या यंत्रणेची सफाई करण्यास शासनाला मदत व्हावी हा हेतु या निर्णयामागे आहे. परंतु, बेकायदेशीर संपदेचा केवळ ६% भागच रोख स्वरूपात बाळगला जात असल्याचे विचारात घेता, यंत्रणेतून काळा पैसा घालवण्यासाठी निश्चलनीकरण किती परिणामकारक ठरेल यावरून मतभेद आहेत.

शासनाच्या निश्चलनीकरणाच्या प्रयत्नामुळे अर्थव्यवस्थेतील रोखीवर चालणाऱ्या क्षेत्रांना धक्का बसला आहे, यामध्ये अन्नपदार्थ आणि इतर संसाधनांच्या दैनंदिन खरेदीचाही समावेश आहे. सामान्य जनतेला त्यांच्या खात्यांमधून पैसे काढण्यासाठी, बदली करून घेण्यासाठी आणि जमा करण्यासाठी तासनतास मोठमोठ्या रांगांमध्ये उभे राहण्याचा त्रास सहन करावा लागत आहे. तसेच, निश्चलनीकरणामुळे भारताच्या वृद्धीमध्ये खीळ बसेल कारण उपभोगाची मागणी रोखतेच्या अभावामुळे खालावलेली आहे. हे स्पष्ट आहे, की निश्चलनीकरणाची अधिक चांगल्या रीतीने केलेली अंमलबजावणी ही छोट्या कालावधीत जास्त प्रभावी ठरू शकली असती. बाजारांवर निश्चलनीकरणाचा प्रभाव संमिश्र ठरला आहे. लघु मुदत कालावधीतील इक्विटीसाठी तो नकारात्मक असून ऋण बाजारपेठांनी (Debt Market) सकारात्मक प्रतिसाद दिला आहे.

अर्थातच, दीर्घकाळात अनेक सकारात्मक बदल घडून येण्याची शक्यता आहे. या निर्णयामुळे अर्थव्यवस्थेत फिरणाऱ्या काळा पैशाचा पुरवठा कमी होणार असून त्यातील बहुतांश हिस्सा कालांतराने अधिकृत अर्थव्यवस्थेत येण्याची अपेक्षा आहे. तसेच, यंत्रणेतून जसजसा काळा पैसा कमी होत जाईल, तसा पैशाचा घटणारा पुरवठा महागाईसुद्धा कमी करू शकेल. अर्थव्यवस्थेला जास्त करवसुली, अधिक चांगले व्यवसाय वातावरण, कमी भ्रष्टाचार, जास्त पारदर्शकता या बाबींचा फायदा होईल आणि ती डिजिटल बँकिंगच्या दिशेने वळेल. इक्विटी बाजार हा निश्चलनीकरणाचे अपेक्षित फायदे दिसून येऊ लागले की अधिक जोमाने उभारी घेण्याची शक्यता आहे.

निश्चलनीकरणाचे खरे परिणाम पुढील काही तिमाह्यानंतर दिसून येणार असले, तरी शासनाने काळा पैसा निर्माण होणे थांबवण्यासाठी अधिक पावले उचलायला हवीत व तसेच निनावी मालमत्ता आणि सोन्याच्या स्वरूपातील बेहिशेबी संपदेवर कारवाई करायला हवी.

आपला,

हेमंत रुस्तगी
संकलक

Address to be affixed here

नोव्हेंबर २०१६ मधील शेअर बाजारातील परिणाम

निर्देशांक	०१ नोव्हेंबर २०१६	३० नोव्हेंबर २०१६	बदल (%)
सेन्सेक्स	२७,८७६.६१	२६,६५२.८१	-४.३९
मिडकॅप	१३,४४१.४३	१२,४९८.६२	-७.०१
स्मॉल कॅप	१३,५५६.८९	१२,३२९.६५	-९.०५
बी एस ई-१००	८,९२०.१८	८,४७९.६८	-४.९४
बी एस ई-२००	३,७५५.०९	३,५५८.१७	-५.२४
बी एस ई-५००	११,८६२.९४	११,१९५.०९	-५.६३

INVEST WITH THE EXPERTS
INVEST WITH **KOTAK SIP**

kotak Mutual Fund

SIP is a Systematic Investment Plan (SIP) that allows you to periodically invest a fixed amount over a defined period of time. With SIP, you benefit from Rupee Cost Averaging, which means you buy more units when the markets are down and lesser units when markets are high. This helps you to ride through the market volatility smoothly. Thus, making your investment more efficient. So, invest with Kotak SIP today and reap the benefits of investing with the experts.

Call: 1800222626 | assetmanagement.kotak.com

Mutual fund investments are subject to market risks, read all scheme related documents carefully.

Connect with us on

म्युच्युअल फंडांना तुमच्या गुंतवणूक धोरणाचा अविभाज्य हिस्सा बनवा

गुंतवणूकीच्या योग्य पर्यायांची निवड एखाद्याला किती कालवधीसाठी गुंतवणूक करायची आहे आणि तो किती रकमेची जोखीम सहन करू शकतो त्यावर अवलंबून आहे.आपल्यापैकी काही स्वाभाविकपणे जोखीम विमुख असतात आणि फारच सुरक्षितपणे गुंतवणूक करतात, ज्यामुळे आपल्या बचतीत आणि गुंतवणूकीत वाढ करण्याच्या क्षमतेवर परिणाम होतो. सुरक्षित आणि आक्रमक गुंतवणूक दृष्टीकोनाचा संबंध एखाद्याच्या पोर्टफोलिओत असणाऱ्या विविध साधनांच्या प्रमाणाशी असतो.

म्युच्युअल फंड गुंतवणूकीची वेगवेगळी उद्दिष्टे साध्य करण्यासाठी विविध पर्याय देतात.तथापि,काही काळानंतर एखादा यशाची कोणती पातळी गाठेल हे योग्य पर्यायाची निवड ठरविते.यात काहीच आश्चर्य नाही कि, एमएफ योजनांमध्ये गुंतवणूक करण्यापूर्वी काय पहावे या बाबतच्या संभ्रमामुळे एखाद्यासाठी निर्णय घेण्याची प्रक्रिया कठिण सिद्ध होते. वस्तुत:, अनेक गुंतवणूकदारांचा त्यांच्यासमोर येणाऱ्या प्रत्येक योजनेत गुंतवणूक करण्याकडे कल असतो. परिणामी, ते एक असा पोर्टफोलिओ विकसित करतात ज्यात अशा योजना असतात ज्या एकतर त्याच्या गुंतवणूकीच्या उद्दिष्टांशी किंवा जोखीम प्रोफाइलशी मिळत्याजुळत्या नसतात.

गुंतवणूकदारांना काही मूलभूत तत्त्वे आणि इक्विटीज आणि डेब्टसारख्या योजनांच्या वेगवेगळ्या प्रवर्गांसाठी योग्य वाटप असले पाहिजे.इतर काही घटकांकडे लक्ष देणे आवश्यक आहे ते म्हणजे लोड स्ट्रक्चर, रोखीकरणीयता, वार्षिक खर्च आणि पोर्टफोलिओची उलाढाल. उपलब्धीच्या दृष्टीने काय अपेक्षा करावी आणि कामगिरीचे मोजमाप कसे करावे हे सुद्धा महत्त्वाचे आहे.

खराखुरा जोखीम विमुख गुंतवणूकदार पारंपरिक स्थिर उत्पन्न साधनांचा मोठ्या प्रमाणावर पक्षपाती असतो.तथापि,करपश्चात उपलब्धी सुधारण्यासाठी, अधिक कर सवलती देणाऱ्या आणि रोखीकरणीय असणाऱ्या विविध डेट आणि डेटसंबधित योजनांचा विचार करणे आवश्यक आहे.

त्यानंतर काही इक्विटी गुंतवणूकदार आहेत,जे त्यांची उपलब्धी सुधारण्यासाठी त्यांच्या गुंतवणूकीच्या बाबतीत काही जोखीम घेऊ इच्छितात. जोखमीच्या पातळीच्या आधारे ते मासिक प्राप्ती योजना, बॅलन्सड फंड,आणि फंड ऑफ फंडस् सारख्या म्युच्युअल फंडाच्या योजना घेऊ शकतात.

एखाद्या आक्रमक गुंतवणूकदारासाठी, म्युच्युअल फंडांकडून अनेक पर्याय उपलब्ध आहेत. वैविध्यपूर्ण इक्विटी फंडांव्यतिरिक्त, ऑपॉर्चुनिटी फंडस्, मिड-कॅप फंडस्, कॉन्ट्रा फंडस् आणि विविध क्षेत्रीय फंडस् आहेत. साधारणपणे असे मानले जाते कि तरुण लोक आणि ज्यांच्या जबाबदाऱ्या कमी आहेत असे लोक आक्रमकपणे गुंतवणूक करतात. परंतु वस्तुस्थिती अशी आहे कि नियमितपणे इक्विटी फंडात गुंतवणूक केल्याने एकूण उपलब्धीच वाढते असे नाही तर, काही कालावधीनंतर एखाद्यासाठी बचत करणे आवश्यक असणारा डोईभारही सोपा होतो.

त्याशिवाय, म्युच्युअल फंड असे पर्याय देतात जे एक दिवसाच्या, महिन्याच्या, वर्षाच्या क्षितीजावरील किंवा जी उद्दिष्टे गाठायला अनेक वर्षे लागू शकतील अशा गुंतवणूकीसाठी सोयीस्कर आहेत.त्या सर्वांच्या वर, कोणत्याही मत्ता वाटपासाटी सोयीस्कर व्हावी अशी पोर्टफोलिओची रचना करणे म्हणजेच डेट आणि इक्विटीमध्ये कोणत्या प्रमाणात गुंतवणूक करायला हवी हे म्युच्युअल फंडांच्या मदतीने शक्य होते. .

दीर्घकालीन गुंतवणूकदारांसाठी, त्यांच्यापाशी नॉन- परफॉरफन्स फंडात सुद्धा डील करण्याची योजना असणे हे महत्त्वाचे आहे. ही प्रक्रिया रोजच्या रोज कामगिरीवर लक्ष ठेवण्याची सवय लावून घेण्याने सुरू व्हावी. आवश्यक असेल तर, एखाद्याने नॉन-परफॉरफन्स योजनेतून मागार घेण्याससुद्धा मागेपुढे पाहू नये. असे करून आणि त्या पैशाची अधिक चांगल्या गुणवत्तेच्या आणि पूर्व इतिहास असलेल्या पोर्टफोलिओत गुंतवणूक करून, एखाद्याला काही काळानंतर त्याची उपलब्धी वाढविण्याची संधि साधता येईल. हे माहीत असणे महत्त्वाचे आहे की नॉन- परफॉरफन्स गुंतवणूकीबाबत भावनाप्रधान होणे किंवा नुकसान भरून येईल या आशेवर अनंत काळ प्रतिक्षा करणे हा निष्फळ प्रयास ठरेल.

त्याच वेळी, एखाद्याला गुंतवणूक केलेल्या फंडाच्या गुणवत्तेबद्दल खात्री असेल तर, अल्पकालीन चंचलतेचा सामना करावा लागल्यास पॅनिक बटण दाबण्याची गरज नाही. दीर्घकालीन आणि नियमित गुंतवणूकदारासाठी, चढउतार एक संधि देतात आणि प्रासंगिक गुंतवणूकदार साधारणपणे ती चुकवतात.

तुमच्या नातेवाईक आणि मित्रांसाठी 'वेल्थवाईज'

तुमचे मित्र, नातेवाईक किंवा सहकारी यांना वेल्थवाईज विनामूल्य प्राप्त व्हावे असे तुम्हांला वाटत असेल तर, तुम्ही संपूर्ण तपशील म्हणजेच पूर्ण नाव, टपाली पत्ता आणि दूरध्वनी क्रमांक, आम्हाला पाठवू शकता. हा तपशील इ-मेल किंवा पत्राद्वारे किंवा आमच्या कोणत्याही शाखेला भेट देऊन पुरवू शकता. तुम्ही जास्तीत जास्त दोन व्यक्तिंचे नामनिर्देशन करू शकता. लक्षात ठेवा, वेल्थवाईज वाचणे ही कोणासाठीही चांगला जाणता गुंतवणूकदार होण्याची आणि म्युच्युअल फंडातील आपल्या गुंतवणूकीतून उत्तम ते प्राप्त करण्याची पहिली पायरी आहे. तेव्हा, कोणाला तरी नामनिर्देशित करा आणि त्यांचे आयुष्य बदलण्यात वेल्थवाईज बरोबर चालना देणारी शक्ती व्हा.

तुम्ही तुमचा मित्र, नातेवाईक किंवा सहकारीचा पूर्ण नाव, टपाली पत्ता आणि दूरध्वनी क्रमांक, information@wiseinvestadvisors.com वर इ-मेल करू शकता किंवा ६५२८१५०७ / २६७३२६७६ (अंधेरी) आणि ६५९२७०५१ / २५३७१५६७ (ठाणे) वर फोन करू शकतात.

निवडक फंडचा परिणाम

२५ नोव्हेंबर, २०१६ रोजी असलेल्या नोंदी

इक्विटी फंडस् - विविध

फंड	सुरवात	१-महिना*	३-महिना*	६-महिना*	१-वर्ष*	२-वर्ष**	३-वर्ष**	५-वर्ष**
एक्सिस इक्विटी फंड	जानेवारी २०१०	-९.०१	-८.११	-१.२२	-०.८०	-१.९१	१२.००	१४.८३
बिर्ला सन लाईफ फ्रन्ट लाईन इक्विटी फंड	ऑगस्ट २००२	-७.९२	-५.४०	५.६०	८.०२	४.०३	१७.६७	१७.७१
बिर्ला सन लाईफ इक्विटी फंड	ऑगस्ट १९९८	-७.८७	-१.३८	१४.०८	१६.६१	१०.४२	२५.६२	२१.०६
बीएनपी पारिबास इक्विटी फंड	सप्टेंबर २००४	-९.१९	-८.७४	-१.२५	-१.३१	१.३३	१५.६१	१५.८१
कॅनरा रोबेको इक्विटी डायव्हरसीफाईड फंड	सप्टेंबर २००३	-९.२५	-६.३४	४.७४	-१.०४	-०.९४	१२.८१	१२.९१
फ्रँकलीन इंडिया प्रायमा प्लस फंड	सप्टेंबर १९९४	-७.६८	-४.९३	३.०६	५.५०	५.९७	२१.७१	१८.२०
एच डी एफ सी इक्विटी फंड	जानेवारी १९९५	-७.४५	-१.८९	१२.६८	७.३५	०.३३	१८.५२	१५.९२
एच डी एफ सी टॉप २०० फंड	सप्टेंबर १९९६	-५.९८	-२.०१	११.७८	८.८९	०.७९	१६.३४	१४.९३
आय सी आय सी आय प्रुडेन्शिअल डायनामीक प्लॅन	ऑक्टोबर २००२	-२.५८	-१.५६	११.६४	१२.७३	४.४६	१६.३५	१६.९८
आय सी आय सी आय प्रुडेन्शिअल फोकस्ड ब्ल्यूचीप इक्विटी फंड	मे २००८	-५.६०	-३.००	७.९५	८.०२	३.२२	१६.०३	१५.७६
कोटक ५०	डिसेंबर १९९८	-७.५३	-५.८९	२.५१	३.५६	३.१९	१५.९४	१४.३५
कोटक सिलेक्ट फोकस फंड	सप्टेंबर २००९	-७.५२	-३.५१	९.७१	९.९३	७.३६	२२.८८	१९.७१
एल & टी इक्विटी फंड	मे २००५	-७.७१	-४.८७	६.३४	५.०६	२.६०	१७.८१	१४.९८
मोतीलाल ओसवाल मोस्ट फोकस्ड मल्टी कॅप ३५ फंड	एप्रिल २०१४	-७.५६	-२.०२	११.२२	१०.६६	१४.७०	^	^
रिलायन्स टॉप २०० रिटेल फंड	ऑगस्ट २००७	-७.७५	-४.४०	८.५२	३.३१	१.८२	१९.४९	१७.५५
इन्वेस्को इंडिया कॉन्ट्रा फंड	एप्रिल २००७	-९.०९	-४.५५	७.१९	७.०८	५.७८	२४.८४	१८.६२
एसबीआय ब्ल्यूचीप फंड	फेब्रुवारी २००६	-७.६५	-५.१५	३.५८	७.४३	६.९६	२०.५१	१९.५०
यूटीआय ऑपोर्चुनिटीज फंड	जुलै २००५	-८.७०	-५.८५	३.२४	२.६६	-१.९७	१२.२६	१२.८७

विभाग, विशेष आणि कर बचत

कॅनरा रोबेको FORCE फंड	सप्टेंबर २००९	-१०.५४	-६.९५	६.६०	६.६५	५.४७	२०.०६	१७.४५
आय सी आय सी आय प्रुडेन्शिअल इन्फ्रास्ट्रक्चर फंड	ऑगस्ट २००५	-५.८१	-४.८८	७.३७	१.०१	-१.३८	१६.८४	११.२०
रिलायन्स बँकिंग फंड	मे २००३	-७.९०	-३.६५	१२.६७	१२.१२	५.३१	२२.८३	१८.३९
रिलायन्स फार्मा फंड	जून २००४	-३.०४	-०.१०	१०.०३	-२.६३	७.९५	२२.७६	२२.३६
एक्सिस लाँग टर्म इक्विटी फंड	डिसेंबर २००९	-८.०६	-६.३८	२.३९	२.८७	४.८४	२३.३०	२१.९३
एच डी एफ सी टॅक्स सेवर फंड	मार्च १९९६	-५.७९	-०.६६	१४.८८	८.१०	१.०७	१८.५५	१५.४३
आय डी एफ सी टॅक्स ॲडव्हान्टेज (ELSS) फंड	डिसेंबर २००८	-९.६५	-५.३४	४.२८	३.६९	५.०१	१८.०१	१८.०८
रिलायन्स टॅक्स सेवर फंड	सप्टेंबर २००५	-८.०४	-३.४९	१०.५५	७.९८	२.३४	२७.२१	२१.७२

मिडकॅप आणि स्मॉल कॅप

कॅनरा रोबेको इमर्जिंग इक्विटीज फंड	मार्च २००५	-१०.८८	-५.४३	९.६३	४.७५	१०.६५	३६.२४	२६.८२
डीएसपीबिआर माइक्रो कॅप फंड	जून २००७	-९.५५	-१.८३	१३.०७	१६.४९	१९.५०	४४.५५	२९.२२
फ्रँकलीन इंडिया स्मॉलर कंपनीज फंड	जानेवारी २००६	-९.६२	-४.४६	९.०३	१३.०५	१३.०६	३५.२५	२९.७०
एच डी एफ सी मिडकॅप ऑपोर्चुनिटीज फंड	जून २००७	-८.६४	-३.३८	१३.९६	१४.७३	११.४६	३१.५४	२४.५२
आय सी आय सी आय प्रुडेन्शिअल व्हॅल्यू डिस्कव्हरी फंड	ऑगस्ट २००४	-५.०२	-२.८६	८.१७	५.२४	६.७४	२७.२६	२३.५०
आय डी एफ सी प्रिमिअर इक्विटी फंड	सप्टेंबर २००५	-१०.६३	-७.१६	०.११	०.२०	४.९८	२१.८२	१८.९४
मोतीलाल ओसवाल मोस्ट फोकस्ड मिडकॅप ३० फंड	फेब्रुवारी २०१४	-९.९८	-२.८३	९.२७	८.९५	१५.०९	^	^
एस बी आय मॅगनम ग्लोबल फंड	सप्टेंबर १९९४	-८.६५	-४.१६	२.८८	२.२९	७.०२	२४.८७	२१.२९
एल & टी इंडिया व्हॅल्यू फंड	जानेवारी २०१०	-७.३८	०.९४	१५.२१	११.७६	१२.५०	३१.५०	२४.८२
रिलायन्स इक्विटी ऑपोर्चुनिटीज फंड	मार्च २००५	-८.१८	-६.७१	४.८४	-४.०२	-२.१४	१७.९१	१७.२६

हायब्रिड - इक्विटी, डेट ओरियन्टेड & मल्टी ॲसेट क्लास

बिर्ला सन लाईफ ९५ फंड	फेब्रुवारी १९९५	-५.६१	-२.६३	८.३१	११.३९	८.००	२०.३०	१६.७२
कॅनरा रोबेको बॅलन्स्ड फंड	फेब्रुवारी १९९३	-६.२३	-२.३४	८.५३	५.१८	६.४६	१९.०४	१६.००
डीएसपीबिआर बॅलन्स्ड फंड	मे १९९९	-६.८०	-१.८७	१०.७१	११.१५	८.७३	२०.५९	१५.१४
एच डी एफ सी बॅलन्स्ड फंड	सप्टेंबर २०००	-४.००	०.३७	१०.४३	११.९१	८.१५	२२.०७	१७.९३
एच डी एफ सी प्रुडेन्स फंड	फेब्रुवारी १९९४	-४.१२	१.८२	१५.७७	११.८२	५.६९	२१.३१	१६.८०
आय सी आय सी आय प्रुडेन्शिअल बॅलन्स्ड ॲडव्हान्टेज फंड	डिसेंबर २००६	-३.१९	-१.०२	७.०२	८.०४	७.४४	१५.१४	१६.२०
आय सी आय सी आय प्रुडेन्शिअल बॅलन्स्ड फंड	नोव्हेंबर १९९९	-३.०५	०.५०	१२.९३	१३.८०	८.५७	२०.६७	१८.५८
कोटक बॅलन्स्ड	नोव्हेंबर १९९९	-४.६९	-१.३६	८.९६	१२.१०	६.४०	१४.३९	१३.७८
एल & टी इंडिया प्रुडेन्स फंड	जानेवारी २०११	-४.९३	-१.४८	७.३२	६.५७	८.६४	२०.४०	१८.२०
रिलायन्स रेग्युलर सेव्हिंग्ज बॅलन्स्ड फंड	जून २००५	-५.३१	-२.४५	६.३६	६.५३	६.१८	१९.५८	१६.७०
एसबीआय मॅगनम बॅलन्स्ड फंड	डिसेंबर १९९५	-४.८५	-०.९१	७.३१	७.८१	८.३४	१९.७३	१९.०७
टाटा बॅलन्स्ड फंड - रेग्युलर प्लॅन	ऑक्टोबर १९९५	-४.९५	-३.१२	६.६८	६.९८	७.४२	२०.९७	१८.२७
एक्सिस ट्रिपल ॲडव्हान्टेज फंड	ऑगस्ट २०१०	-३.१५	-२.४२	४.४०	९.४४	५.०२	८.४५	८.४१
फ्रँकलीन इंडिया डायनामिक पी ई रेशिओ फंड	ऑक्टोबर २००३	-१.६८	-०.२३	५.६०	७.९०	६.४२	१३.०६	११.७०
कोटक इक्विटी सेव्हिंग्ज फंड - रेग्युलर प्लॅन	ऑक्टोबर २०१४	-१.४१	०.१४	४.२४	६.६९	६.४२	^	^

* पूर्ण मोबदला - ** वार्षिक मोबदला.योजनेची पूर्वीची कामगिरी तिच्या भविष्यातील कामगिरीची निदर्शक नाही.

नोव्हेंबर २०१६ मध्ये इक्विटी व इक्विटी ओरियंटेड फंडने घोषित केलेला निवडक फंडचा नफ्याचा हिस्सा

योजनेच नाव	तारिख	घोषित केलेला नफ्याचा हिस्सा रुपये प्रती युनिट	योजनेच नाव	तारिख	घोषित केलेला नफ्याचा हिस्सा रुपये प्रती युनिट
एच एस बी सी इक्विटी फंड (D)	०२/११/२०१६	३.००	एल & टी टॅक्स ॲडव्हान्टेज (D)	१८/११/२०१६	१.००
एच एस बी सी मिडकॅप इक्विटी फंड (D)	०२/११/२०१६	१.७५	एल & टी इंडिया प्रुडेन्स फंड (D)	१८/११/२०१६	०.०९
एक्सिस इक्विटी सेवर (MD)	०३/११/२०१६	०.०६	कोटक इक्विटी आरबीट्राज - Regular (D)	२२/११/२०१६	०.०६
टाटा बॅलन्स्ड फंड - Regular (MD)	०३/११/२०१६	०.४९	कोटक ऑपोर्चुनिटीज फंड - Regular (D)	२३/११/२०१६	०.८०
कॅनरा रोबेको इक्विटी टॅक्स सेवर (D)	०४/११/२०१६	१.००	इन्वेस्को इंडिया डायनामीक इक्विटी (D)	२४/११/२०१६	०.११
आय सी आय सी आय प्रुडेन्शिअल इक्विटी इन्कम फंड (MD)	०४/११/२०१६	०.०४	बिर्ला सन लाईफ टॅक्स रिलिफ ९६ (D)	२५/११/२०१६	६.६२
आय सी आय सी आय प्रुडेन्शिअल बॅलन्स्ड ॲडव्हान्टेज (MD)	०४/११/२०१६	०.०८	कॅनरा रोबेको बॅलन्स (MD)	२५/११/२०१६	०.६०
आय सी आय सी आय प्रुडेन्शिअल बॅलन्स्ड फंड (MD)	४/११/२०१६	०.२५	कॅनरा रोबेको इमर्जिंग - इक्विटीज (D)	२५/११/२०१६	२.५०
एडलवाईज आरबीट्राज फंड - (D)	१०/११/२०१६	०.०८	कॅनरा रोबेको लार्ज कॅप (D)	२५/११/२०१६	१.३२
बिर्ला सन लाईफ इमर्जिंग लिडर्स - Sr 1-RP (D)	१७/११/२०१६	१.२८	एच डी एफ सी प्रुडेन्स फंड (D)	२५/११/२०१६	०.३०
बिर्ला सन लाईफ इमर्जिंग लिडर्स - Sr 2-RP (D)	१७/११/२०१६	२.२०	एल & टी आरबीट्राज ऑपोर्चुनिटीज (MD)	२५/११/२०१६	०.०५
बिर्ला सन लाईफ इमर्जिंग लिडर्स - Sr 3-RP (D)	१७/११/२०१६	२.१३	एसबीआय मॅगनम ग्लोबल फंड (D)	२५/११/२०१६	५.००
बिर्ला सन लाईफ इमर्जिंग लिडर्स - Sr 4-RP (D)	१७/११/२०१६	२.२१	एक्सिस एनहॅन्स्ड आरबीट्राज फंड RP (D)	२८/११/२०१६	०.०५
बिर्ला सन लाईफ इमर्जिंग लिडर्स - Sr 5-RP (D)	१७/११/२०१६	१.५३	डीएसपीबिआर बॅलन्स्ड (D)	२८/११/२०१६	०.२१
बिर्ला सन लाईफ इमर्जिंग लिडर्स - Sr 7-RP (D)	१७/११/२०१६	१.२९	जे एम आरबीट्राज ॲडव्हान्टेज (D)	२८/११/२०१६	०.०८
जे पी मॉरगन इंडिया इक्विटी फंड (D)	१७/११/२०१६	०.२०	आय सी आय सी आय प्रुडेन्शिअल मल्टी कॅप फंड (D)	२९/११/२०१६	२.१०
डीएसपीबिआर टॅक्स सेवर फंड (D)	१८/११/२०१६	०.४०	आय डी एफ सी आरबीट्राज प्लस - B (D)	२९/११/२०१६	०.१४

तुमच्या पोर्टफोलियोमध्ये या यादीत असणाऱ्या तुमच्या फंडसाठी तुम्हाला डिव्हिडन्ड (नफ्याचा हिस्सा) मिळाला आहे का ते बघा. जर तुमच्याकडे कोणतीही पोर्टफोलिओ नोंद नसेल तर वाईजइन्व्हेस्ट ॲडव्हायझर्स तुमच्यासाठी ते कोणत्याही मोबदल्याशिवाय करुन देतील. एकदा आमच्याकडे तपशिल आला की आम्ही तुम्हाला दर महिन्याला नोंदी पाठवू. या मोफत सेवेचा लाभ घेण्यासाठी आमच्या मुख्य कार्यालयाशी किंवा इतर कोणत्याही शाखेशी संपर्क साधा.

सिक्युरिटी गुंतवणुकीप्रमाणेच म्युच्युअल फंड, शेअर बाजार आणि इतर धोक्यांवर अवलंबून असते. कॅपिटलमार्केटवर परिणाम करणाऱ्या घटकांवर आणि प्रभावांवर एन ए व्हि (NAV) चे वर किंवा खाली जाणे अवलंबून असते.

Registered - R.N.I. No.: MAHMAR/2008/26837 • Postal Regd. No.: MCN/110/2015-2017 • Posted at Mumbai Patrika Channel Sorting Office, GPO, Mumbai on 12th & 13th of every month.
Date of publication: 8th of every month.

वेळ आली आहे, वित्तीय नियोजनाची कास धरण्याची

वित्तीय नियोजन म्हणजे फायनान्शियल प्लॅनिंग, ही तुमचे भविष्य सुरक्षित करण्यासाठी पैशाचे माहितीयुक्त व्यवस्थापन करण्याची प्रक्रिया आहे. फायनान्शियल प्लॅनिंग उपलब्ध स्रोत, जबाबदाऱ्या, जोखीम क्षमता आणि जीवनशैली ह्याचा विचार करून वित्तीय उद्दिष्टे आणि वैयक्तिक प्राधान्यक्रम साध्य करण्यास मदत करते. जोखीम-लाभ संतुलन साधण्यासाठी वित्तीय योजनेत आपल्या बचतीचे नियतन विविध मालमत्तावर्गांमध्ये केले जाते.

तुम्हाला वित्तीय योजनेची गरज आहे का?

सर्व व्यक्तींना आणि कुटुंबांना, त्यांचे उत्पन्न किंवा वय काहीही असले तरी एका वित्तीय नियोजनाची गरज असते. त्यामुळे निवृत्तीसाठी, महाविद्यालयीन शिक्षणासाठी किंवा नव्या घरासाठी आपण पुरेशी बचत करीत आहोत की नाही ह्याची जाणीव त्यांना होते. आपल्याला वित्तीय योजना आपल्या पैशाची बचत करण्यासाठी आवश्यक असलेली शिस्त देते. एखादा अर्हताप्राप्त आणि अनुभवी वित्तीय नियोजक तुम्हाला तुमच्या गुंतवणुकींचे नियोजन करण्यास मदत करू शकतो जेणेकरून तुम्ही तुमच्या गुंतवणुकी विभिन्न मालमत्ता वर्गांमध्ये तसेच गुंतवणूक पर्यायांमध्ये विभाजित करून तुमच्या जोखीम पातळीत सर्वोत्तम उत्पन्न मिळवू शकता.

वाईजइन्व्हेस्ट ॲडव्हायझर्स हे सेबी नोंदणीकृत गुंतवणूक सल्लागार आहेत (नोंदणी क्र. INA000000664). आमच्या सल्लासेवा आणि कार्यकारी सेवांमध्ये अंतर राखण्यासाठी आम्ही इन्व्हेस्टमेंट ॲडव्हायझर डिपार्टमेंट (IAD) ह्या नावाने स्वतंत्र विभाग स्थापन केलेला आहे.

आम्ही तुम्हाला तुमची उद्दिष्टे साध्य करण्यासाठी मदत करू शकतो. त्यासाठी आम्ही तुम्हाला सर्वमावेशक शुल्काधारित फायनान्शियल प्लॅनिंग पुरवितो आणि बहुतेकांच्या गरजा पूर्ण करू शकतील अशी वित्तीय उत्पादने सुचवतो. अनिश्चिततेवर मात करून तुम्ही तुमच्या पैशावर नियंत्रण मिळवून आपली उद्दिष्टे साध्य करण्यासाठी आत्मविश्वासाने पुढे जाण्यास तुम्हाला मदत करणे हे आमचे ध्येय आहे. काम किती गुंतागुंतीचे आहे ह्यावर शुल्क किती असेल ते ठरते.

ध्यानात असू द्या, फायनान्शियल प्लॅनिंग ही छाती दडपून टाकणारी प्रक्रिया असण्याची काही गरज नाही. आमच्याकडे असलेले अर्हताप्राप्त आणि अनुभवी सल्लागार फायनान्शियल प्लॅनिंग ही तुमच्यासाठी एक साधी आणि लाभदायी प्रक्रिया करतील.

आमची प्रक्रिया :

१. पहिली भेट आमच्यासाठी आणि तुमच्यासाठी एकमेकांची ओळख होण्याची एक संधी देते. आम्ही तुमच्या सर्व आवश्यकता पूर्ण करण्यास सक्षम आहोत की नाही हे ठरविण्याची एक संधीही तुम्हाला मिळते.

२. तुमची ध्येये आणि उद्दिष्टे तसेच तुमची सध्याची स्थिती स्पष्टपणे समजून घ्या. तुम्हाला तुमच्या संपत्तीने काय साध्य करायचे आहे ह्यावर आपण एक चर्चा करू.

३. चर्चा आणि एक सायकोमेट्रिक चाचणी ह्यांच्या साहाय्याने तुमची जोखीम रूपरेषा निश्चित करा. ह्यामुळे तुम्हाला तुमची ध्येये साध्य करण्यासाठी किती जोखीम घ्यायला हवी आणि किती जोखीम घेणे तुम्ही आवश्यक आहे हे आम्हाला शोधून काढता येईल.

४. तुमची अशी खास वित्तीय योजना म्हणजे फायनान्शियल प्लॅन विकसित करा. ह्यामध्ये तुमच्या गरजेनुरूप शिफारशीनुसार मालमत्ता नियतन आणि गुंतवणूक पर्यायांचा समावेश असेल. हे करताना आम्ही तुमच्या सध्याच्या गुंतवणुकींचेही विश्लेषण करू. आम्ही खास तुमच्या गरजेनुरूप बेतलेल्या फायनान्शियल प्लॅनची अंतिम आवृत्ती सादर करू म्हणजे तुम्ही आगेकूच करण्यास सज्ज असाल.

५. गुंतवणूक प्लॅनची अंमलबजावणी करा. फायनान्शियल प्लॅनमध्ये केलेल्या शिफारशी अंमलात आणण्यासाठी वाईजइन्व्हेस्ट ॲडव्हायझर्सचीच निवड करण्याचे तुमच्यावर बंधन नाही. मात्र तुमची तशी इच्छा असल्यास तुम्ही आमच्या कार्यकारी विभागाच्या सेवेचा लाभ शिफारशी अंमलात आणण्यासाठी घेऊ शकता.

६. तुमच्या परिस्थितीमधील तसेच बाजारांमधील, अर्थव्यवस्थेमधील आणि करांमधील बदल हाताळण्यासाठी आपण नियमितपणे आणि सक्रियपणे भेटू.

जर तुम्ही वित्तीय नियोजनाची प्रक्रिया सुरू करण्यास उत्सुक असाल तर तुम्ही आमच्या अंधेरी कार्यालयात इन्व्हेस्टमेंट ॲडव्हायझर्सशी संपर्क साधू शकता.

वाईजइन्व्हेस्ट ॲडव्हायझर्स प्रायव्हेट लिमिटेड

(CIN No.: U74140MH2003PTC142921)

मुख्य कार्यालय

अंधेरी : ६०२, सहावा मजला, श्रीकृष्ण कॉम्प्लेक्स, न्यु लिंक रोड, अंधेरी (पश्चिम), मुंबई – ४०० ०५३. **टेलिफोन :** ६५२८ १५०७ / २६७३२६७६ . **फॅक्स :** २६७३ २६७१.

इ-मेल : information@wiseinvestadvisors.com / information3@wiseinvestadvisors.com

शाखा

ठाणे : ५०२, पाचवा मजला, प्रतीभा बिल्डींग, तीन पेट्रोल पंप जवळ, पाचपाखाडी, ठाणे (पश्चिम) – ४०० ६०२. **टेलिफोन :** ६५९२ ७०५१ / २५३७ १५६७ . **फॅक्स :** २५३९ १३०६.

इ-मेल : information1@wiseinvestadvisors.com

www.wiseinvestadvisors.com

जाहीर निवेदन : प्रकाशनाच्या वेळी यातील सर्व माहिती चुकीची व खोटी नाही याची खात्री केलेली असून, त्याच्या अचूकतेबद्दल व पूर्णत्वाबद्दल आम्ही कोणतेही प्रतिनिधित्व करत नाही. वाईजइन्व्हेस्ट ॲडव्हायजर्स प्रायव्हेट लिमिटेड ला जबाबदार न धरता सर्व माहिती पुरविण्यात आलेली आहे.
धोके : म्युच्युअल फंड, जसे की सिक्युरिटी इन्व्हेस्टमेन्ट हे शेअर बाजार व इतर धोक्यांवर अवलंबून असतात आणि योजनेची उद्दिष्टे साध्य होतीलच असे खात्रीलायक सांगता येत नाही. सिक्युरिटीजमधील इतर गुंतवणुकीप्रमाणेच युनिटचे एन ए व्हि (**NAV**) वर किंवा खाली जाऊ शकते व ते कॅपिटल मार्केटवर परिणाम करणाऱ्या घटकांवर व प्रभावांवर अवलंबून असते. कृपया, गुंतवणूक करण्यापूर्वी ऑफर डॉक्युमेन्ट वाचा.

श्री. हेमन्त कुमार रुस्तगी यांनी ६०२, सहावा मजला, श्रीकृष्ण कॉम्प्लेक्स, न्यु लिंक रोड, अंधेरी (पश्चिम), मुंबई ४०००५३ येथून, वाईजइन्व्हेस्ट ॲडव्हायजर्स प्रायव्हेट लिमिटेड यांच्यासाठी संपादित, प्रकाशित केले आहे व ॲडव्हान्टएज ऑफ्सेटप्रिंटर्स, के-७ रिजवी पार्क, एस. व्ही. रोड, सांताक्रुझ (पश्चिम), मुंबई ४०००५४ येथे छापले आहे.

Edited, Published and Printed by Mr. Hemant Kumar Rustagi, on behalf of **Wiseinvest Advisors Pvt. Ltd.** from 602, 6th Floor, Sri Krishna Complex, Opp. Laxmi Ind. Estate, New Link Road, Andheri West, Mumbai 400053 at **AdvantEdge Offset Printers,** K-7 Rizvi Park, S.V. Rd. , Santacruz (W), Mumbai 400 054. Design by **Mosaic Design.** Copyright reserved © 2007. All rights reserved in favour of Wiseinvest Advisors Pvt. Ltd.